# परिपत्रक

वाचले : १. परिपत्रक क्र. एफएलआर.२४७६/६० दि.२.१२.१९७८,

२. परिपत्रक क्र. सीएलआर.११८५/FLAVOUR/अकरा - ब दि.२८.५.१९८५ (printed in Government Gazette Part IV(c) dtd.२८.५.१९८५ pages ८६६ to ८६८ )

३. परिपत्रक क्र. सीएलआर.११८५/FLAVOUR/ अकरा - ब दि.१७.७.१९८५

४. परिपत्रक क्र.सीएलआर.११८५/FLAVOUR/५-ब दि.८.७.१९९२.

क्र.सीएलआर.११२००२/४९३५९/५-ब मुंबई, ३ सप्टेंबर २००२.

महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३चा नियम ६(३७) मधील तरतुदीनुसार सर्व देशी मद्य उत्पादकांनी देशी मद्य निर्मितीमध्ये वापर करावयाचे अर्क व स्वाद यांचे नमुने घटकाच्या प्रभारी अधिकाऱ्यामार्फत केमिकल अॅनॅलायझरकडे पाठवुन नमुन्यांचा पृथःकरण अहवालअन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार योग्य असल्याचा दाखला प्राप्त झाल्यासच आयुक्तांच्या पूर्वमान्यतेने त्यांचा वापर करावयाचा आहे. तसेच जे अर्क व स्वाद त्यांचा पुरवठा केल्यापासुने १२ महिन्यांपेक्षा अधिक जुने असतील त्या अर्क व स्वादांचे पुन्हा नमुने काढुन तपासणी करणे सुध्दा आवश्यक आहे. सदर नियमाच्या परंतुकातील तरतुदीनुसार मद्य निर्मात्यांनी अर्क व स्वाद आयुक्तांनी मान्यता दिलेल्या उत्पादकांकडुन थेट खरेदी केल्यास व सदर उत्पादकांनी अर्क व स्वाद अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींनुसार योग्य असल्याचा दाखला दिल्यास सदर अर्क वस्वादाचा पुरवठा केल्यापासुन १२ महिन्यांच्या आत त्याचा वापर करता येऊ शकेल व १२ महिन्यांनंतर वापर करावयाचा असल्यास वर नमुद केलेल्या पध्दतीनुसार नमुन्यांचे पृथःकरण पुन्हा करणे आवश्यक आहे.

या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे की, काही देशी मद्य निर्माते उपरोक्त पध्दतीचा अवलंब न करता आयुक्तांच्या मान्यतेशिवाय व पृथःकरण अहवालाशिवाय अर्क व स्वाद याचा वापर करतात काही मद्य उत्पादकांनी **कृत्रिम रंगाचा वापर** करुन देशी मद्याची निर्मिती केल्याचे तसेच काही देशी मद्य निर्माण्यां **केन शुगर कॅरॅमलचा** वापर करत असल्याचा संशय आहे.

नियमभंगांची पुनरावृ-त्ती टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे पध्दत विहीत करण्यात येत आहे.

सर्व प्रभारी अधिकारी

## (अ) अर्क व स्वाद यांच्या उत्पादकाखेरीज अन्य घटकाकडुन पुरविण्यात आलेले अर्क व स्वाद

अ(१). अर्क व स्वाद याचा पुरवठा त्यांच्या उत्पादकाव्यतिरिक्त इतरांकडुन झाला असल्यास सदर अर्क व स्वादाचा वापर करण्यापूर्वी प्रभारी अधिकाऱ्यांनी अर्क व स्वाद यांचा नमुना खालीलपैकी कोणत्याही प्रयोगशाळेस पाठवुन सदर नमुन्यात अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यान्वये निर्बंध घातलेल्या उत्पादनांचा आंतर्भाव नसल्याचे तसेच कृत्रिम रंग, मानवी सेवनास अपायकारक पदार्थ व उत्पादकाच्या साखरेपासुन बनविलेले कॅरॅमल यांचा आंतर्भाव नसल्याची तपासणी करुन घ्यावी.

१. पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी,
६०६, कोकण भवन, नवी मुंबई.

२. स्टेट पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी,
पुणे.- ४११ ००१.
TEL.NO.(०२०/६३ ६१ ६०८)
FAX NO.(०२०/६३६०३३४)

३. हाफकीन इन्स्टिटयुट,
आचार्य दोंदे मार्ग,
परेल, मुंबई - ४०० ०१२.

४. सेंन्ट्रल फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिटयुट,
हयुमन रिसोर्स डेव्हलपमेंट डिपार्टमेंट,
म्हैसुर - ५७० ०१३.

उपरोक्त प्रयोगशाळांचा आंतर्भाव केमिकल ॲनॅलायझरच्या व्याख्येत करण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात येत आहे.

अ(२). वरील पध्दतीनुसार पृथ:करण केलेल्या अर्क व स्वाद यांचा वापर फक्त अर्क व स्वाद प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन १२ महिन्यांच्या कालावधीत करता येऊ शकेल. सदर कालावधीनंतर वापराशिवाय राहिलेल्या अर्क व स्वादांचा पुर्नवापर करण्यापूर्वी वर (अ)(१) मध्ये नमुद केल्यानुसार नमुन्यांचे पृथ:करण पुन्हा करण्यात यावे.

अ(३). वरील(अ) (१) प्रमाणे दाखला प्राप्त झाल्यावर सदर अर्क व स्वाद यांच्या वापरास मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव पृथ:करण अहवालासहआयुक्तांना सादर करावा व आयुक्तांना मंजुरी दिल्यानंतर प्रत्यक्ष वापरास परवानगी द्यावी.

**<u>(ब) अर्क व स्वाद यांच्या उत्पादकाकडुन थेट पुरवठयात आलेले अर्क व स्वाद</u>**

ब(१). अर्क व स्वाद यांचा पुरवठा त्यांच्या उत्पादकांनी थेट केला असल्यास सदर अर्क व स्वाद उत्पादकाने त्यामध्ये अ(१) मध्ये नमुद केल्याप्रमाणे आक्षेपार्ह बाब नसल्याचा दाखला **<u>दोन प्रतीत</u>** सादर करणे आवश्यक राहील असा दाखला प्राप्त करुन अर्क व स्वाद यांचा वापर **<u>आयुक्तांच्या पूर्वमान्यतेने</u>** करता येऊ शकेल.

ब(२). वर अ(३) मध्ये नमुद केल्यानुसार अर्क व स्वाद यांचा पुरवठयाच्या दिनांकापासुन १२ महिन्यांत वापर न झाल्यास वर अ(२) मध्ये नमुद केल्यानुसार सदर अर्क व स्वाद यांचे नमुने घेऊन पडताळणी करणे क्रमप्राप्त आहे.

क) जे अर्क व स्वाद विदेशी मद्य निर्मिती करता वापरण्यात येतात त्या अर्क व स्वाद यांचा वापर देशी मद्य निर्मितीसाठी करता येणार नाही.

ड) वरील (अ) व (ब) प्रमाणे ज्या अर्क व स्वाद यांचा वापर आयुक्तांनी मंजुर केला आहे त्यांच्या नोंदी घेण्यासाठी सोबत जोडल्याप्रमाण **अर्क व स्वाद मंजुरी विवरण** विहीत करण्यात येत आहे. सदर विवरण दरवेळी नवीन अर्क व स्वाद यांना मंजुरी घेताना आयुक्त कार्यालयास सादरकरणे क्रमप्राप्त राहील

इ) देशी मद्य उत्पादक त्यांच्या नवीन ब्रॅन्डच्या किंवा नवीन लेबलच्या मंजुरीच्या वेळी पुढीलप्रमाणे दाखला अर्जासोबत जोडतील.

<u>दाखला :</u>

शपथपूर्वक घोषित करण्यात येते की, देशी मद्याच्या ब्रॅन्डमध्ये वापरण्यात येणारा अर्क व स्वाद यांना आयुक्तांची मान्यता घेण्यात आली आहे. तसेच अर्क व स्वाद यामध्ये अन्न व औषध प्रशासन विभाग किंवा केंद्र तथा राज्य शासनाने बंदी घातलेल्या कोणत्याही पदार्थांचा आंतर्भाव नाही.

सीएल -१ अनुज्ञप्तीधारकाच्या अधिकृत प्रतिनिधीचे नांव व

स्वाक्षरी

दाखल्यावर स्वाक्षरी केलेल्या प्रतिनिधीस स्वाक्षरी करण्यास घटकाने प्राधिकृत केल्याची खात्री केली आहे.

प्रभारी अधिकाऱ्याची प्रतिस्वाक्षरी.

ई. क्र.अ (२) व ब(२) मध्ये नमुद केल्यानुसार १२ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीने वापरावयाचे अर्क व स्वाद यांच्या नमुन्यांचे पृथ:करण अहवाल प्राप्त झाल्यावर त्यास पुन्हा आयुक्तांच्या मंजुरीची आवश्यकता असणार नाही.

फ. वर अ.क्र - ड मध्ये नमुद केल्यानुसार या पूर्वी मंजुर केलेल्या अर्क व स्वाद यांच्या नोंदी सदर विवरणात घेण्यासाठी सर्व सीएल-१ घटकांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी सध्या वापरात असलेल्या सर्व मंजुर अर्क व स्वाद यांना आयुक्तांनी मंजुरी दिल्याच्या पुराव्यासह तसेच अर्क व स्वाद यांच्या उत्पादकाने दिलेल्या आखल्यास / किंवा पृथ:करण अहवाल उपलब्ध अवसल्यास तयासह प्रस्ताव सादर करावा म्हणजे प्रत्येक घटकासाठी तक्ता करुन पाठविण्यात येईल. ही कार्यवाही १५ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करावयाची आहे. सध्याची पध्दत फक्त १५ ऑक्टोबर पर्युंत सुरु राहील. १६ ऑक्टोबर २००२ नंतर सदर विवरणात मंजुर असलेल्या अर्क व स्वाद यांचाच वापर तक्त्यात नमुद केलेल्या ब्रॅन्ड्स करिता करता येऊ शकेल. जे सीएल-१ अनुज्ञप्तीधारक १५ ऑक्टोबर पूर्वी विवरणे प्राप्त करुन घेणार नाहीत त्या निर्माण्यांना विवरणे मंजुर होईपर्यंत मद्य निर्मिती करता येणार नाही.

वरील प्रमाणे विवरणे मंजुर झाल्यानंतर नवीन अर्क व स्वाद यांना मंजुरी घेण्यासाठी प्रस्ताव पाठविताना सोबत विवरण पाठविणे बंधनकारक राहील. प्रस्तावासोबत प्राप्त झालेल्या विवरणात नोंदी घेऊन विवरण परत करण्यात येईल त्यानंतरच नवीन मंजुर केलेल्या अर्क व स्वाद यांचा वापर करता येऊ शकेल.

(ग) अर्क व स्वाद यांचे हिशोब ठेवणे व त्यांची पडताळणी.

सर्व देशी मद्य उत्पादकांनी मंजुर केलेल्या अर्क व स्वाद यांचे दैनंदिन हिशोब खाली विहीत केलेल्या नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. हे परिपत्रक प्राप्त होताच शिल्लक मंजुर अर्क

व स्वाद यांचे हिशोब लिहिण्यास सुरवात करावी. तसेच त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्क व स्वाद यांचेही हिशोब दररोज ठेवण्यात यावेत. सदर हिशोबांची व शिल्लक साठयांची पडताळणी अनुज्ञप्तीचे निरीक्षण करणारे अधिकारी व महालेखापाल तसेच या कार्यालयातील व विभागीय उप आयुक्ताच्या कार्यालयातील अंतर्गत लेखा परीक्षा पथकामार्फत करण्यात यावे. सदर पथकानी त्यांच्या निरीक्षण अहवालात अर्क व स्वाद यांच्या साठ्यातील त्रुटीबाबत अभिप्राय नोंदविणे आवश्यक राहील. अर्क व स्वाद यांचे हिशोब घटकाने ठेवावयाचे असुन त्यावर प्रभारी अधिकाऱ्याने हिशोब तपासुन बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर स्वाक्षरी करावयाची आहे. हिशोब अपुरे आढळल्यास किंवा त्यातील अन्य त्रुटीबाबत घटकाप्रमाणे प्रभारी अधिकारीही कार्यवाहीस जबाबदार रहातील.

**<u>अर्क व स्वाद यांच्या हिशोबाकरिता नोंदवही.</u>**

| अ. क्र. | दिनांक व महिना | अर्क व स्वाद यांच्या उत्पादकाचे व ब्रॅन्डचे नांव व कोड नंबर. | अर्क व स्वाद यांची सुरवातीची शिल्लक. | प्राप्त झालेला अर्क व स्वाद. | अर्क व स्वाद यांचे वापरलेले परिमाण (देशी मद्याच्या ब्रॅन्डचे नांव व बॅचचा क्रमांक) | शिल्लक अर्क व स्वाद | घटकाच्या प्रतिनिधीची स्वाक्षरी | प्रभारी राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्याची स्वाक्षरी. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

उपरोक्त तक्त्यातील हिशोब २५ ऑक्टोबर पूर्वी लिहिण्यास सुरवात करावी. अर्क व स्वाद यांच्या हिशोबासाठी ठेवावयाच्या नोंदवहीवर विभागीय उप आयुक्तांच्या कार्यालयाचे सील, शिक्के व मंजुरी आवश्यक राहील.

(ह) लेबलवर छापावयाच्या मजकुराबाबत.

महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३चा नियम ६ (२४) मधील तरतुदीनुसार लेबल्सवर छापावयाच्या मजकुराच्या बाबी विहीत केल्या आहेत. तसेच या कार्यालयाचे उपरोक्त क्र.२चे परिपत्रक दि.२८.५.१९८५ अन्वये देशी मद्याकरिता फक्त पांढरी, चित्रविरहित, प्लेन (plain) लेबल वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र या अटीचे पालन मद्य उत्पादकाकडुन होत नाही. रंगीत लेबल्सवर छापलेले बॅच क्रमांक, एमआरपी वगैरे वाचण्या

इतपत स्पष्ट नसतात. सबब पुन्हा उपरोक्त निर्बंधांची कडक अंमलबजावणी करावयाचे प्रस्तावित आहे. तसेच प्लेन लेबलवर छापावयाच्या मजकुराची जागा सुध्दा निश्चित(standard) करण्याचे प्रस्तावित आहे. सबब देशी मद्य उत्पादकांना आगाऊ सूचित करण्यात येते की, त्यांनी यापुढे रंगीत लेबल्सच्या छपाईच्या नवीन ऑर्डर्स देऊ नयेत. प्लेन लेबलवर सध्या छापण्यात येणाऱ्या "ऊस मळीच्या मद्यार्कात ----चा कृत्रिम स्वाद घालुन तयार केलेली " या घोष वाक्याऐवजी "ऊस मळीच्या मद्यार्कात ....चा अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत मंजुर असलेला अर्क / स्वाद / नैसर्गिक रंग मिश्रीत" असे घोषवाक्य बदलण्याचा विचार आहे. घटकाना याबाबत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या ३० सप्टेंबर २००२पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात. याबाबतच्या घटकांच्या सूचना विचारात घेऊन प्लेन लेबल्सच्या वापराबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

हे परिपत्रक महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३चा नियम ४७ मधील अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

या परिपत्रकाची पोच सीएल-१ अनुज्ञप्त्या असलेल्या जिल्हयांचे अधीक्षक व सर्व देशी मद्य निमाण्यांचे प्रभारी अधिकारी यांनी द्यावी.

सोबत : विवरण.

(ए.रामकृष्णन्)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता.

प्रति
१. सर्व सीएल-१ घटक.
२. सर्व सीएल-१ घटकांचे प्रभारी अधिकारी.
३. सर्व अधीक्षक राउशु.
४. सर्व विभागीय उप आयुक्त, राउशु.
५. सर्व जिल्हाधिकारी.

आ (col-cs-cir)

## अर्क व स्वाद मंजुरी विवरण

सीएल-१ अनुज्ञप्तीधारकाचे नांव प-ता.
अनुज्ञप्ती क्रमांक.

| अ.क्र. | अर्क व स्वाद उत्पादकाचे नांव व प-ता | अर्क व स्वाद यांच्या ब्रॅन्ड व कोड नंबर व दाखल्याचा क्रमांक | ज्या ब्रॅन्डकरिता अर्क व स्वाद मंजुर करण्यात आले त्या ब्रॅन्डचे नांव | अर्क व स्वाद यांना मंजुरी दिल्याच्या पत्राचा क्रमांक व दिनांक. | मंजुरी प्राधिकरणाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

टीप : १. हा तक्ता दरवेळी नवीन अर्क व स्वाद यांना मंजुरी घेताना सादर करुन त्यावर नोंदी करुन घ्याव्या लागतील.

२. अर्क व स्वाद उत्पादकाने दिलेल्या दाखल्याच्या प्रतीवर आयुक्त कार्यालयाचा शिक्का, स्वाक्षरी असल्यास दाखला ग्राह्य राहील.